**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.**

मा.शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०५

**सभावृत्तांत**

**दिनांक - २१/०१/२०२२** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माशिक्षण समितीची पाक्षीक सभा शुक्र**वार** दिनांक २१**/१/२०२२** रोजी **दुपारी २.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दुस-या मजल्यावरील मा.सभापती शिक्षण समिती यांचे दालनात मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
**२. मा.पवार मनिषा प्रमोद**
**३. मा.बारसे प्रियांका प्रविण**
**४. मा.खानोलकर प्रज्ञा महेश**
**५. मा.वाघमारे अश्विनी विक्रम**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.स्मिता गौड - प्रशासन अधिकारी (१) मा.रोहिणी शिंदे प्रशासन अधिकारी (२) मा.पराग मुंढे - सहा.प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय :-१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील वर्ग खोल्याच्या भिंतीवर शैक्षणिक भित्तीचित्रे रंगवून घेणेबाबत...**
**मा.प्रियांका बारसे , मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.**

---------

**दिनांक - ०६ /०१/२०२२ व दि.१०/०१/२०२२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.०४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ०९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २१/०१/२०२२

सुचक :- मा. मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा. माधवी राजापुरे

संदर्भ – मा. प्रियांका बारसे व माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने मनपाच्या सर्व शाळांमधील वर्गखोल्यामध्ये शैक्षणिक भितीचित्रे रंगवून घेतल्यास विद्यार्थांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांना शिक्षणाची जास्त आवड निर्माण होईल. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील वर्ग खोल्याच्या भिंतीवर शैक्षणिक भितीचित्रे रंगवून घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(राजापुरे माधवी राजेंद्र)**
**सभापती**
मा.शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ /२०२२
दिनांक : २१/01/२०२२



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.तज